भारत शिक्षण संस्था संचालित,

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,

## उमरगा जि. उस्मानाबाद

(संलग्नित: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

---

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेषशिबीरअहवाल

## ग्रामस्वच्छता व जल संवर्धनासाठी युवा”

मौजे कदमापूर ता. उमरगा

दि. १८/०१/२०२०२० ते २४/०१/२०२०

---

२०१९ -२०२०

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित उपक्रम अहवाल - २०१९ -२०

### प्रस्तावना

महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्य संवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने. म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरु, माजी शिक्षण मंत्री डॉ.व्ही.के.आर राव यांच्या प्रेरणा व दृष्ट्या नेतृत्वातून २४ सप्टेंबर १९६९ला राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासीशिबीरातून स्वंयसेवकामध्ये श्रमदान,संवाद, संघटन, नेतृत्व, कौशल्य विकास,त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या हेतूने प्रत्येक स्वंयसेवकाला विविध कार्याचे वाटप करून स्वत:ला घडण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. शिबीराच्या माध्यमातून सांयकाळी विविध सामाजिक विषयावर पथनाट्य, एकांकिका, नाटक, काव्यवाचन, कथा-कथन आदि सांस्कृतिक कार्यक्रमातून ग्रामीण भागांतील नागरिकांचे उद्बोधन व मनोरंजन केले जाते.

आजचे महाविद्यालयीन युवक उद्याचे आधारस्तंभ आहेत. या स्वंयसेवकामधूनच उद्याचे शास्त्रज्ञ,अभियंते, शिक्षणतज्ञ, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, विचारवंत, व्यावसायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, साहित्यिक सुजाणआदर्श नागरिक निर्माण होणार आहेत. म्हणूनच राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वाची आहे.

महाविद्यालयीनविद्यार्थ्यांनीफक्तवर्गखोल्यांमध्येच शिक्षणनघेतासमाजामध्येजाऊनलोकांच्या सोबत राहून, त्यांच्याप्रश्नांनासमजूनघ्यावे, त्यांच्यातसामाजिक जाणीव निर्माण व्हावी, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्यवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी व यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २०१९ -२० या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रमंसोबातच मौजे कदमापूर ता. उमरगा येथे सात दिवसीय **“ग्रामस्वच्छता व जल संवर्धनासाठी युवा”** विशेष निवासी शिबीर आयोजित केले. या विशेष शिबिरात १५० स्वयंसेवकांनी डॉ. विनोद

देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी व डॉ. पार्वती सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरातील नियोजित दिनचर्येनुसार नुसार सर्व कार्यक्रमात सहभागी होवून सदर शिबीर यशस्वी केले.

शिबिराची दिनचर्या खाली प्रमाणे होती-

| | |
|---|---|
| स. ५.३० ते ७.३० | योग, प्राणायाम व कवायती |
| स. ७.३० ते ८.३० | अल्पोपहार व चहापान |
| स. ८.३० ते १.०० | श्रमदान |
| दु. १.०० ते २.३० | स्नान व भोजन |
| दु. २.३० ते ३.०० | विश्रांती |
| दु. ३.०० ते ४.०० | बौद्धिक गटचर्चा |
| सा. ४.०० ते ५.३० | व्याख्यान |
| सा. ५.३० ते ७.०० | मनोरंजनात्मक खेळ |
| सा. ७.०० ते ८.०० | भोजन |
| रा. ८.०० ते १०.०० | सांस्कृतिक कार्यक्रम / विविधगुणदर्शन |

शिबिरामध्ये प्रामुख्याने ग्रामस्वच्छता मोहीम, जल संधारणाची कामे, नाली सरळीकरण व स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण जनजागरण मोहीम, आदिउपक्रमांतून समाजामध्ये जाणीव जागृती करण्याचे कार्य रासेयोच्या स्वयंसेवकांनीकेले.शिबिरादरम्यान राबवण्यात आलेल्या सर्व कृती कार्यक्रमांचा विस्तृत अहवाल पुढेसादर करीत आहे.

## ग्राम स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा : शिबिराचे उद्घाटन (१८/०१/२०२०)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे "ग्रामस्वच्छता व जलसंवर्धन साठी विशेष युवा शिबिर" याची मौजे कदमापुर येथे दिनांक १८/१/२०२० रोजी श्रमदानाने सुरवात झाली. "राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता व जलसंधारणाची कामे करतानाच गावकऱ्यांच्या मनातही स्थान निर्माण करून महाविद्यालयाची प्रतिमा उंचवावी व गावाच्या विकासास हातभार लावावा" असे आवाहन निवासी शिबिराचे उद्घाटन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी असलेले डॉ. घनश्याम जाधव यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे उद्घाटक भारत शिक्षण संस्थेचे संचालक मा. दिगंबर बिराजदार हे होते. "मोबाईलच्या ऐवजी हातात कुदळ फावडे घेऊन मशागत केली तर माणिक मोती पिकावता येतील, देशाचा विकास साधता येईल" असे मत त्यांनी उद्घाटनपर मनोगतातून व्यक्त केले. उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी यावेळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन

केले. ग्रामस्थांच्या वतीने श्री भास्कर झाकडे यांनी मतप्रदर्शन केले तर गावातील सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात नियमित रहावे असे आवाहन श्री अरविंद पाटील यांनी केले.

यावेळी प्रा. एस. टी. दाडगे, मा. लक्ष्मण मम्माळे (सरपंच, ग्रामपंचायत कदमापुर), श्री धनराज बिराजदार (उपसरपंच), श्री पवनकुमार माळी (ग्रामविकास अधिकारी), श्री भास्कर झाकडे (पोलीस पाटील), श्री अशोक मम्माळे (अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त समिती), श्री विठ्ठल जमादार (अध्यक्ष, जि. प. शाळा समिती), श्री प्रकाश कुंभार, श्री शंकर सुरवसे, कदमापुर गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी यासोबतच कार्यक्रमाधिकारी प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. मुरलीधर जाधव, डी. व्ही. बोंदर, डॉ. एस. एन. मुछट्टे, डॉ. जी. एन. सोमवंशी, प्रा. बुवा, प्रा. चिकुंद्रे, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पद्माकर पिटले यांनी केले तर डॉ. सी डी करे यांनी आभार मानले. कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हि. डी. देवरकर, डॉ. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, डॉ. सी. डी. करें, प्रा.मुरलीधर जाधव, आदी उपस्थित होते.

## दुसरा दिवसः (१९/०१/२०२०)

शिबिराच्या नियोजित दिनचर्या नुसार सकाळी ५.३० ते ७.३० दरम्यान सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा.राजेंद्र सूर्यवंशी,प्रा. डॉ विनोद देवरकर, प्रा.डी. डी.पांढरे यांच्यामार्गदर्शना खाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली निवास स्थळ, हनुमान मंदिर परिसर ग्रामपंचायत कार्यालय परिसर यामध्ये स्वच्छता अभियान राबवले.

एकेकाळी जगभरात थैमान घालणाऱ्या पोलिओ ला वेसण घालण्याचे काम रोटरी फाऊंडेशन आणि बिल गेट्स फाऊंडेशन यांनी मिळून करत आहेत. त्याच उपक्रमांतर्गत १९ जानेवारी हा दिवस पाच वर्षाखालील बालकांना लस देण्यासाठी नियोजित आहे. “राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आरोग्य सेविकासमवेत गावातील घराघरात "दो बूँद जिंदगी के" हा नारा पोहचवला व लसीकरण कार्यक्रमास मदत केली. नियोजित वेळेनुसार ठीक २.०० वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतरच्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चे मध्ये भाग घेतला. बौद्धिक गट चर्चेसाठी त्यांना जलप्रदूषण व त्यावरील उपाय हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गट चर्चानंतर असा निष्कर्ष काढण्यात आला की, जलप्रदूषण टाळण्यासाठी ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे गरजेचे आहे. या संबंधात रॅली काढून ग्रामस्थांचे घोषवाक्य व घोषवाक्य फलकांच्या माध्यमातून प्रबोधन करणे आवश्यक आहे.

बौद्धिक गटचर्चा नंतर डॉ. एस. एन. अस्वले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास यावर व्याख्यान दिले. रायला ह्या रोटरीच्या उपक्रमांतर्गत यशस्वी होण्याचे सूत्र स्वयंसेवकांना समजून सांगितले. याप्रसंगी डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी हे अध्यक्षस्थानी होते तर श्री लक्ष्मन मम्माळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

व्याख्यानानंतर मनोरंजनात्मक खेळ प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. एस, एन. मुच्छत्ते, प्रा. जी. एन. सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

सायंकाळच्या भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रा. मुरलीधर जाधव यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता चुटकुले आणि गीत गायन यामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पद्माकर पिटले यांनी केले.

## तिसरा दिवस: (२०/०१/२०२०)

शिबिराच्या नियोजित दिनचर्या नुसार सकाळी ५.३० ते ७.३० दरम्यान सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे व डॉ. जी. एन. सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम स्वच्छता करत गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरी व आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला.

यामध्ये स्वयंसेविकासाठी "शिक्षण - काळाची गरज" या विषयावर महिला मेळावा व जनजागृती रॅली आयोजित केली होती. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील प्राध्यापिका या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. "मुलींना समाजात वावरताना अनेक संकटांना सामोरे जात शिक्षण, नोकरी, संसार करावा लागतो. पण त्याला घाबरून न जाता सातत्याने प्रयत्न करत यश प्राप्ती पर्यंत पोहचले पाहिजे असे मत स्वतःचा जीवन प्रवास सांगताना त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी डॉ. आशा शिंदे, डॉ. रेशमा नितनवरे, प्रा. बकुळ कांबळे, प्रा. बीना लोकरे, प्रा. ज्योती जोळदापके, प्रा. हिना सय्यद, प्रा. वसुंधरा निचत, प्रा. मोरे, प्रा. जाधव व प्रा. अलंगे यांनी जीवन प्रवास सांगून स्वयंसेविकांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हिना सय्यद यांनी केले तर डॉ. आशा शिंदे यांनी आभार मानले. नियोजित वेळेनुसार ठीक२.०० वाजता स्वयंसेवकव कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतरच्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चेमध्ये सक्रिय भाग घेतला. बौद्धिक गटचर्चेसाठी त्यांना “भ्रष्टाचार व उपाय” हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गटचर्चानंतर स्वयंसेवकांनी लाच घेणार नाही व देणारही नाही, नैतिक व्यवहार करणार व भ्रष्टाचारास खतपाणी घालणाऱ्या व्यक्तीस प्रतिबंध करेल असा निर्णय केला.

याप्रसंगी डॉ. सुभाष इंगळे यांनी श्रमदान व राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रीडाशास्त्र विभागप्रमुख प्रा. विजय पवार होते. यांच्यासमवेत व्यासपीठावर श्री संतोष बिराजदार, कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर व व नियोजक डॉ सन्मुख मुछट्टे उपस्थित होते.

दान हे नेहमीच सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे मग ते कोणत्याही प्रकारचे असो. सद्य परिस्थितीमध्ये व्यक्तीकडे पैसा आहे पण वेळ नाही आणि वेळ असला तर त्या वेळेत श्रम करण्याची तयारी नाही. म्हणूनच श्रमदान हे श्रेष्ठदान म्हटले तर वावगे ठरू नये. श्रमदानाच्या माध्यमातून असाध्य वाटणारी आणि कामे लीलया केल्या जाऊ शकतात

आणि हाच वसा राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांच्या मनात ठसवला पाहिजे असे मत बौद्धिक व्याख्यानादरम्यान डॉ सुभाष इंगळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर. एम. सूर्यवंशी यांनी केले तर डॉ. जी. एन. सोमवंशी यांनी आभार मानले.

व्याख्यानानंतर मनोरंजनात्मक खेळ प्रा. डी. व्ही. बोंदर, डॉ. ए. के. कटके यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सायंकाळच्या भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वावदेण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रा. एस डी शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता चुटकुले आणि गीतगायन यामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सी. डी. करे यांनी केले तर डॉ. राजेंद्र सूर्यवंशी यांनी आभार मानले.

## चवथा दिवस: (२१/०१/२०२०)

सकाळीच उठून सर्व स्वयंसेवकांनी योगप्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा एस डी शिंदे, प्रा डी डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शना खाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शना खाली कदमापूर ग्रामपंचायत बाजूच्या जागेतील स्वच्छता, जलव्यवस्थापन साठी अनघड दगडी बंधारा दुरुस्ती सारखी कामे श्रमदानातून केले. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवकव कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतरच्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चे मध्ये सक्रिय भाग घेतला. बौद्धिक गटचर्चेसाठी त्यांना "सुदृढ मनासाठी कला" हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गटचर्चानंतर स्वयंसेवकांनी कला हा जीवनाचा अविभाज्य अंग असून एक तरी कला जोपासून त्याचा मानसिक वा सामजिक स्वास्थ वर्धनासाठी उपयोग केला पाहिजे असा निष्कर्ष काढला.

बौद्धिक गट चर्चा नंतर प्रा एस. ई. बिराजदार यांनी "जल संवर्धन काळाची गरज" यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. मराठवाड्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा सर्वश्रुत आहे. वनक्षेत्र कमी व त्यातही पर्जन्यछायेचा प्रदेश म्हणूनच मराठवाड्याची ओळख आहे. अत्यल्प पावसामुळे पाण्याचा प्रश्न कायमचा ऐरणीवर असतो. अशा बिकट परिस्थितीमध्ये जे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आपल्याकडे आहेत त्यांची निगा राखून पिण्याचा पाण्याचा योग्य वापर केला तरच भविष्यात येणाऱ्या पिढ्यांना पाणी मिळू शकेल असे मत प्रा सुनील बिराजदार यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय निवासी शिबिरादरम्यान बौद्धिक व्याख्यानांचे आयोजन शिबिरार्थी यांसाठी केल्या जाते. याप्रसंगी प्रा. सुनील बिराजदार यांनी जलसंवर्धन ही काळाची गरज या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. शेखर दाडगे होते. यांच्यासमवेत व्यासपीठावर सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख प्रा. विनोद देवरकर व व नियोजक प्रा. पी. डी. पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान अलांगेसिर यांनी केले तर महेश रणखांब यांनी आभार मानले. "स्वच्छता, स्वयंशासन, व संस्कृती जतन यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांचा अंगीकार केला पाहिजे" असे

मत सोदाहरण व्यक्त या प्रसंगी प्रा. एस. टी. दाडगे यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले. श्री अशोक मम्माले यांची या प्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

व्याख्यानानंतर स्वयंसेवक व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने प्रा. पी. डी पाटील, प्रा. मुरलीधर जाधव यांच्या मार्गदर्शना खाली संपन्न झाला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गीत गायन, नृत्य या प्रकारात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ग्रामस्थांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सी. डी. करे यांनी केले तर डॉ. पी. ए. पिटले यांनी आभार मानले.

## पाचवा दिवस: (२२/०१/२०२०)

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा विनोद देवरकर, प्रा डी डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शना खाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शना खाली अनघड दगडी बंधारा निर्मिती सारखे कठीण काम श्रमदानातूनकेले. या नंतर कदमापूर गावात स्वच्छता यात्रा स्वयंसेवकांनी काढली. अंतर्गत रस्ते, प्लास्टिक निर्मूलन, फळकांच्या माध्यमातून जलसंवर्धन जनजागृती करण्यात आली. तसेच स्वयंसेवकांनी हुंडाबळी, वृक्ष तोड यावर पथनाट्य सादर करून ग्रामस्थांचे मनोरंजन व प्रबोधन केले. नियोजित वेळे नुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

दुपारच्या भोजनानंतर महिला मेळावा व स्वसंरक्षण मार्गदर्शन घेण्यात आला. निसर्गाने स्त्री-पुरुष असा भेदभाव न ठेवता दोघांची ही क्षमता पूर्ण निर्मिती केली. मग एकास एक व दुसऱ्यास वेगळी वागणूक का? पती पत्नी संसाराची दोन चाके आहेत. त्यांचे समतोल राखणे गरजेचे आहे म्हणजे संसार सुखाचा होईल. त्याच प्रमाणे मुलांनी मुलींकडे बघण्याचा दृष्टीकोन समतोल ठेवला तर स्त्री सक्षमकरणाची गरजच पडणार नाही. मुलींनी ही बेडरपणे व्यक्त व्हायला शिकले पाहिजे असे मत अध्यक्षीय भाषणातून प्रा. बिना लोकरे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी प्रा. हिना सय्यद यांनी "मी कोण आहे?" ही कविता सादर केली व प्रा. श्रीमती बकुळ कांबळे यांनीही स्वयंसेविकाना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी शिवाजी विद्यालय, कदमापूरचे विद्यार्थी, शिक्षकवृंद, कार्यक्रमाधिकारी प्रा राजेंद्र सूर्यवंशी, प्रा सुजित शिंदे, प्रा डी डी पांढरे, प्रा. आर एम खराडे, प्रा. सी डी करे, प्रा मुरलीधर जाधव, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कू. प्रतीक्षा पाटील तर डॉ. आशा शिंदे यांनी आभार मानले.

## सहावा दिवस: (२३/०१/२०२०)

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा एस डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली गावाच्या लगत असलेल्या दोन डोंगराच्या मध्ये दगडी बंधारा टाकण्याचे काम पूर्ण केले, पावसाचे पाणी अडवून

जीर्वल्या जाऊ शकते. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

दुपारच्या भोजनानंतर आयोजित मेळाव्यात, ' स्त्री ही कुटुंबाचा फक्त कणाच नसून आर्थिक प्रगतीची नाडी असते. वेळ प्रसंगी घरखर्चासाठी दिलेल्या पैशातून वाचवलेले पैसे ती पुन्हा अडचणीच्या काळात पतीच्या स्वाधीन करते. हीच स्त्री जर करती कमावती झाली तर कुटुंब व्यवस्था अधिक बळकट होऊ शकते. त्यासाठी स्त्रियांनी बचत गटाच्या माध्यमातून कमी व्याजदरावर कर्ज उचलून व्यवसाय केला तर आर्थिक उन्नती होऊ शकते' असे प्रतिपादन उमेद तालुका समन्वयक विवेकानंद पवार यांनी महिला बचत गट मेळाव्यात मार्गदर्शन दरम्यान केले.

कदमापूर येथील निवासी शिबिरात आयोजित (दि.२३) स्थानिक महिला व स्वयंसेवी कामांसाठी आयोजित महिला बचत गट मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याचे अध्यक्ष अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय डॉ. पंडित पुरी हे होते तर प्रमुख पाहुणे उमेद तालुका समन्वयक श्री विवेकानंद पवार व उन्नत भारत समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.यावेळी डॉ. संजय अस्वले म्हणाले की, कौटुंबिक चाकोरीतून बाहेर पडून बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक बळकटी साधली पाहिजे.

ग्राम स्वच्छता व त्याचे सामाजिक आरोग्यावर होणारे परिणाम विशद करतानाच शरीरस्वास्थ्य आणि कौटुंबिक जीवन यावर डॉक्टर पंडित पुरी यांनी अध्यक्षीय समारोपातून प्रकाश टाकला. उपस्थित सर्व महिलांची व स्वयंसेवीकांची मोफत आरोग्य तपासणी करून या मेळाव्याची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, सूत्रसंचालन डॉ. ए. के. कटके यांनी केले तर डॉ. आर. एम. सूर्यवंशी यांनी आभार मानले.याप्रसंगीकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राजेंद्र सूर्यवंशी, प्रा.सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. चिकुंद्रे, डॉ. सी डी करे, प्रा. बुवा, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा.बोंदर, प्रा. मुच्छत्ते व सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

## सातवा दिवस: शिबिराचा समारोप (२४/०१/२०२०)

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा डी. डी. पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. सकाळच्या योगाभ्यास नन्तर परमेश्वर मंदिर परिसरात जाऊन स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

सकाळच्या समारोपाच्या कार्यक्रमाची तयारी स्वयम्सेवकांनी केली. "राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिरांमधून स्वयंसेवकांनी केलेले श्रमदान त्यांच्यावर श्रमसंस्कार घडवत. ज्यामुळे श्रमप्रतिष्ठा वृध्दींगत होऊन आत्मविश्वास व समाजसेवा भाव वाढतो जो उत्तम नागरिक घडवण्यासाठी मदत करतो. बौद्धिक गटचर्चा व व्याख्यानांच्या माध्यमातून व्याख्यात्यांचे जीवनानुभव स्वयंसेवक ग्रहण करतात ज्यामुळे त्यांचे अनुभवविश्व प्रगल्भ होते" असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजने चे जिल्हा समन्वयक डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे होते तर प्रमुख उपस्थिती सरपंच श्री लक्ष्मण मंम्माळे यांची होती.

"विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेचे तत्व अंकुरित करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वर्षभर अनेक उपक्रम राबवले जातात. त्यापैकी निवासी शिबिर हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असतो. हे निवासी शिबिर विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र बदल घडवून आणत असतात" असे प्रतिपादन डॉ. घनश्याम जाधव यांनी या वेळी केले.

ग्रामस्थांच्या वतीने श्री प्रश्न भोसले यांनी मनोगत व्यक्त करतांना स्वयंसेवकांनी केलेल्या कामाची पावती देत पुढल्याही वर्षी कदमापूर येथेच निवासी शिबिर घ्यावे अशी विनंतीही केली.

यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, सरपंच श्री. लक्ष्मण मम्माळे, उपसरपंच श्री. धनराज बिराजदार, ग्राम विकास अधिकारी श्री. पवनकुमार माळी, पोलीस पाटील श्री. भास्कर झाकडे, श्री. प्रकाश कुंभार, श्री. दत्ता भाले, श्री. विठ्ठल जमादार, कदमापूर गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी यासोबतच कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हि. डी. देवरकर, प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बुवा, डॉ. ए. के. कटके, प्रा. चिकुंद्रे, डॉ. सी. डी. करें, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. डी. व्ही. बोंदर, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. जी. एन. सोमवंशी, मोहन पवार, विनायक जाधव, विजय अंसारवाडे, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सन्मुख मुछट्टे यांनी केले तर महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अशोक मंम्माळे यांनी आभार मानले."विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्तीचे बीजरोपण करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अनेकविध कार्यक्रम राबवले जात असतात. त्यापैकी अतिशय महत्वाचा शिबिराचा उपक्रम असतो. ही निवासी शिबिरे विद्यार्थ्यांवर संस्कार करतात व त्यांच्यात अमुलाग्र बदल घडवून आणतात. त्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने जगाकडे बघायला शिकवतात" असे प्रतिपादन डॉ. घनश्याम जाधव यांनी या वेळी केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे समन्वयक डॉ. टी. आर. पाटील यांनी दूरध्वनीवरून स्वयंसेवकांशी संवाद साधून "प्रत्यक्ष आयुष्यात जगतानाही 'नॉट मी, बट यू' चे तत्व अवलंबावे" असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डी. वी. थोरे, प्रा. मुरलीधर जाधव, श्री अरविंद पाटील, आदी उपस्थित होते.

## फलित:श्रमदानातून उभारला अनघड दगडी बंधारा

लोकसहभाग व श्रमदानातून गाव पातळीवर खूप चांगले काम केले जाऊ शकते. त्यासाठी गरज असते ती अंत:प्रेरणेची व हाती घेतलेल्या कार्याला पूर्णत्वास नेण्याची उर्मी. कदमापूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय निवासी शिबिर नुकतेच पार पडले. ग्राम स्वच्छता व जलसंवर्धनासाठी प्रबोधन व श्रमदान या शिबिरादरम्यान केले केले. राष्ट्रीय स्वयंसेवक व ग्रामस्थांच्या मदतीने कदमापूर गावास पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळ १५ फूट लांबी ४ फूट रुंद व १० फूट उंचीचा अनघड दगडी बंधारा अथक ८०० मनुष्यतास श्रमदान करून उभारण्यात आला. या बंधाऱ्यामुळे अंदाजे एक लाख लिटर पाणी अडवून जमिनीत जिरावल्या जाईल. ज्यामुळे गावाची पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यास मदत होईल. असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

जलसंधारणाच्या या कृती कार्यास पूर्णत्वास नेल्याबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल मोरे, उपाध्यक्ष, श्री. अश्लेष मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, उपप्राचार्य (कनिष्ठ) प्रा. बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक, प्रा. व्ही. जी. तडोळगे, सरपंच श्री. लक्ष्मण मम्माळे, उपसरपंच श्री. धनराज बिराजदार, ग्राम विकास अधिकारी श्री. पवनकुमार माळी, पोलीस पाटील श्री. भास्कर झाकडे, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्री. अशोक मंम्माळे, श्री. प्रकाश कुंभार, श्री. दत्ता भाले, श्री. विठ्ठल जमादार, कदमापूर गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळींनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांचे अभिनंदन केले आहे.

रासेयो स्वयंसेवकांनी कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बुवा, डॉ. ए. के. कटके, प्रा. चिकुंद्रे, डॉ. सी. डी. करें, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. डी. व्ही. बोंदर, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. जी. एन. सोमवंशी व डॉ. सन्मुख मुछट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य केले.

## "ग्रामस्वच्छता व जल संधारणासाठी युवा" – मौजे कदमापूर येथे विशेष शिबिराचे उद्घाटन व बौद्धिक व्याख्याने





**उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी असलेल्या मा. दिगंबर बिराजदार, प्रा. डी. व्ही.थोरे, प्रा. एस. टी. दाडगे , मा. लक्ष्मन मम्माले, व आदि मान्यवर मार्गदर्शन करतांना.**



**'राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास' महिला मेळाव्य दरम्यान डॉ एस एन अस्वले मार्गदर्शन करतांना.**



**'राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास' या बौद्धिक व्याख्यानाचा समारोप करतांना श्री पवार**



'जलसंवर्धन मध्ये युवकांची भूमिका' या विषयावर डॉ. एस. पी. इंगळे आपले मनोगत व्यक्त करतांना



प्रा. विजय पवार अध्यक्षीय समारोप करतांना.



बौद्धिक व्याख्यानांची गरज यावर मत प्रदर्शित करतांना प्रा. पी. डी. पाटील



'जलसंवर्धनकाळाचीगरज'यावरप्रा. एसईबिराजदारअभ्यासपूर्णव्याख्यानदेतांना.



महिला मेळाव्याच्या आयोजनाची प्रस्तावना करतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर



महिला मेळावा मार्गदर्शन कार्यशाळेतअध्यक्षीय भाषण करतांना प्रा. बीना लोकरे



शिबिरादरम्यान महिलांची आरोग्य तपासणी करतांना डॉ. पंडित पुरी आणि त्यांची टीम.




शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना जिल्हा समन्वयक प्रा. सुर्यकांत आगलावे

## “ग्रामस्वच्छता व जल संधारणासाठी युवा” – विशेष शिबिरातील कृती क्षणचित्रे





दिनचर्येची सुरुवात योग-प्राणायाम व शारीरिक व्यायाम, कवयतींच्या माध्यमातून करतांना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी





सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता श्रमदानाच्या माध्यमातून करतांना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी



परिसर स्वच्छतेपूर्वी



परिसर स्वच्छते नन्तर



परिसर स्वच्छतेपूर्वी



परिसर स्वच्छतेनन्तर



श्रमदानातून अनघड दगडी बंधारा उभारतांना स्वयंसेवक



श्रमदानातून अनघड दगडी बंधारा उभारतांना स्वयंसेवक



श्रमदानातून अनघड दगडी बंधारा उभारतांना स्वयंसेवक



बंधारा पूर्णते नंतर आनंद व्यक्त करतांना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी



ग्राम परिसर स्वच्छता करतांना स्वयंसेवक



पथनाट्य, एकपात्री, व कविता सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करतांना स्वयंसेवक







रस्ते सरळीकरण व नाली स्वच्छता करतांना स्वयंसेवक

 

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. सुर्यकांत आगलावे  स्वयंसेवकांना समारोप प्रसंगीमार्गदर्शन करतांना. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे व कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर**

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**